ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१ !



jpp51_51@jnanaprabodhini.org

गोष्ट क्र. १०
७ मार्च २०२१

गीतांजली भट
(नानिवडेकर)
(१९७५ -१९८१)



आता आयुष्याची पन्नास वर्षं झाल्यावर मला असं वाटतं की आयुष्यात मी जे काही केलं आहे, जेवढ मिळवलं आहे ते आता या पुढच्या आयुष्यात मी समाजापर्यंत पोचवणार आहे. जे काही सामाजिक काम मी करते त्या मागचा हाच उद्देश असतो, जे काही मला माझ्या गुरुजनांनी दिलं आहे, मग ती सवय असेल, विचार करण्याची पद्धत असेल हे मला पुढे न्यायचं आहे.

एवढ्या सगळ्या जबाबदाऱ्या सांभाळताना एक गोष्ट निकराने करावी लागते ती म्हणजे switch on आणि switch off करता येणे. आणि मला अगदी १०० टक्के खात्री आहे की हे कौशल्य  ध्यानानेच तयार होऊ शकतं. जेव्हा मी एक गोष्ट करायला घेते तेव्हा मला दुसरी गोष्ट आठवतही नाही. So actually I think that, it is never multitasking, it is always one task at a time.

प्रबोधिनीत आल्या-आल्या पहिली वेगळी अशी जाणवलेली गोष्ट म्हणजे वर्ग छोटे होते, आम्ही वर्गात २२ जणीच होतो. विद्याताई हर्डीकर आम्हाला प्रत्येकीला कायम भाषण करायला सांगायच्या आणि आयुष्यात पुढे मी जी काही भाषणबाजी केली त्या सगळ्याचं मूळ हे प्रबोधिनीत शिकवलं असं म्हणायला हरकत नाही. शाळेत नवी गाणी शिकायला मिळायची, गोष्टी ऐकायला मिळायच्या, नवे प्रकल्प करायला मिळायचे. मला आठवतंय मी इयत्ता ६वी त असताना प्रकल्प करताना (a+b)2 =a2 + b2 + 2ab हे सूत्र मी शोधून काढलय असं मला वाटत होतं. ७वी मध्ये जेव्हा मी ते पुस्तकात बघितलं तेव्हा माझा हिरमोड झाला होता. इतकं गुंगून जाऊन प्रकल्प करायची सवय लागली होती. आमच्या वेळेस नियमित दल ही संकल्पना अस्तित्वात आलेली नव्हती. पण वेगळी गोष्ट म्हणजे सगळ्या ताया घरी यायच्या त्यामुळे त्यांच्याशी चांगले ऋणानुबंध जोडले गेले. इतर शाळांमध्ये फक्त अभ्यास असतो त्यापेक्षा बऱ्याच गोष्टी वेगळ्या आम्हाला शाळेत करायला मिळायच्या.

सहलीला गेल्यावर दर वेळेस आम्ही रस्ता चुकायचो, रायगडला गेलो, रस्ता चुकलो, तोरण्याला गेलो, रस्ता चुकलो. आणि मग तो शोधून प्रत्येकवेळा गडावर पोचावं लागायचं. माझ्या वैयक्तिक आयुष्यावर अतिशय परिणामकारक असं शिबिर म्हणजे गांधी विचार अभ्यास शिबिर. त्याच्या आधी अहिंसा म्हणजे काय हे फारसं समजलं पण नव्हतं आणि दुसरा गाल पुढे करणं वगैरे जरा पटायचं नाही. पण त्या अभ्यास शिबिरात, त्यांचे लिखाण वाचले, चरित्र वाचले. त्याचा सखोल परिणाम माझ्या आयुष्यावर झाला आणि ते विचार आजही माझ्या सोबत आहेत. असंच एक गीता अभ्यास शिबिर झालं होतं त्यात वाचलेले अध्याय आजही लक्षात आहेत.



पंजाब दौऱ्याच्या वेळेस सगळ्या गटाच्या आधी तिथे आखणी करायला आम्ही पाच युवती गेलो होतो. सगळ्या गावोगावी फिरून पुढे येणाऱ्या १००च्या गटासाठी नियोजन केलं होतं. त्या सगळ्यातून खूप शिकायला मिळालं. ती सवय आता अंगात भिनली आहे. क्रीडा प्रात्याक्षिकांच्या वेळी आण्णांनी आम्हाला नियोजनाचं महत्त्व पटवून दिलं होतं आणि आमच्याकडून करून घेतलं होतं. अगदी कुठल्या सतरंजीची कुठल्या टोकाची घडी कोण घालणार इथपासूनचं नियोजन त्यांनी आमचं करून घेतलं होतं. जी दहा माणसं आपल्यासाठी वेळ काढून येणार आहेत त्यांच्या वेळेचं महत्त्व आपण ठेवायला हवं. बारकाईने नियोजन करायची जी सवय तेव्हा लागली ती अगदी आज ही मुलाखत देतानाही मी तयारीनिशी आले आहे इथपर्यंत ती सवय भिनलेली आहे. दलांमधून लागलेली ही नियोजनाची सवय आयुष्य बदलणारी ठरली. युवती विभागात काम करताना मी आधी दलप्रतोद होते आणि मग साहाय्यक युवती सचिव होते. त्या जबाबदाऱ्या सुद्धा मी महाविद्यालयाच्या पहिल्या-दुसऱ्या वर्षाला असताना घेतल्या. माझ्याबरोबर सुवर्णाताई आणि संगीताताई कायम असायच्या आणि आम्ही पर्वतीवर जाऊन आयुष्यात पुढे काय मोठं करायचं याची स्वप्नं रंगवायचो. मला वाचनाची खूपच आवड होती. लताताईंनी खूप मोठ्या पुस्तकांच्या याद्या दिल्या होत्या. त्याच्यामुळे वाचनाची खूप आवड लागली. आणि निश्चितच आपला दृष्टीकोन रुंदावयाला खूप मदत होते.

**प्रबोधिनीपासून वेगळी वाट कुठे व्हायला लागली असा विचार केला तर मला तेव्हा असं वाटायचं की आपल्याकडे एक खूप ठराविक संकुचित वृत्ती असलेल्या माणसांची वर्दळ असते. जसं-जसं मी पुणे विद्यापीठ किंवा आणखी जास्त पातळीवरच्या, विविध पार्श्वभूमीच्या माणसांना भेटत गेले तसं हे मला जास्त जाणवायला लागलं, आणि मग असा प्रश्न पडायला लागला की प्रबोधिनीचं काम हे कुपमंडूक होतंय की काय? आज जेव्हा मी परत प्रबोधिनीत जाऊन बघते तेव्हा नक्कीच असं दिसतं की आता प्रबोधिनी सर्वसमावेशक झालेली आहे. अजूनही विस्तार वाढवायला जागा आहे.** जर मी चार झोपडपट्टीतल्या मुलींना घेऊन दलावर आले तर त्यांची बोलीभाषा आणि आपली भाषा, आपल्याला भेडसावणाऱ्या समस्या आणि त्यांना पडणारे प्रश्न, त्यांची गरज आणि आपण दलावर देत असलेले विचार यामध्ये खूप तफावत वाटायची आणि त्यावेळेस तिथे थोडे रस्ते वेगळे व्हायला सुरुवात झाली.

**मला प्रबोधिनीत असताना असं वाटायचं की आपण हुशार आहोत, आपण अभ्यास न करता सहज उत्तीर्ण होऊ शकतो पण MCA ला गेल्यावर कळलं, की अरे बाहेरची लोकं खूप अभ्यास करतात, खूप कष्ट करतात. तिथेही माझ्या वर्गात ७००० तून निवडलेले २२ लोकं होते आणि सगळेच हुशार असूनही भरपूर अभ्यास करणारे होते. अभ्यास न करता परीक्षा पास व्हायची सवय लागल्यामुळे कदाचित बाकीचा उडाणटप्पूपणा जास्त केला जात असावा. मी मला समजल्यानंतर**

**खूप खुश असायचे. समजलेले परत गिरवायची मला सवयच नव्हती जी MCA ला गेल्यावर लागली. Intelligence cannot be a substitute for hard work. And sheer hard work without direction is useless. Direction only comes to you if you are humble. तरुणपणी humble राहणं अवघड असतं. पण आयुष्य चापट्या मारतं, धक्के देतं, थोडा अपमान करतं मग आपण नम्र होतो, मग आपल्याला दिशा सापडते आणि मग आपले कष्ट मार्गी लागायला लागतात. प्रत्येकाच्या आयुष्यात हे उतार– चढाव येतात. जर आपण आपल्या चुकांमधून योग्य तो सल्ला घेतला नाही तर आपण आणखी खाली जात राहतो.**

मी एकदा अशोकरावांना विचारलं होतं, की आयुष्याच्या कुठल्या टप्प्यापर्यंत आपलं career किंवा उद्दिष्ट सापडायला पाहिजे? तेव्हा त्यांनी उत्तर दिलं होतं, की वयाच्या २५व्या वर्षापर्यंत किमान आपल्याला आपलं कार्यक्षेत्र सापडायला हवं. खरंतर मला माझे वडील हे वाणिज्य शाखेत म्हणजे कॉमर्सला घालणार होते पण नलूताईंनी त्यांचं मन बदलून त्यांना सांगितलं की हिला विज्ञान शाखेत जाऊ दे आणि तो एक माझ्यासाठी आयुष्य बदलून टाकणारा निर्णय ठरला.

माझं पदवीचं शिक्षण चालू असताना मी एका stock broker च्या हाताखाली नोकरी करत होते.I am a fiercely independent person. मला घरी पैसे मागायला आवडायचं नाही. आई शिक्षिका असल्यामुळे माझी फी माफ होती पण तरीही स्वतःसाठी खर्च करायला पैसे कमवायला आवडायचं. पुढे campus interview मधून माझी ज्या कंपनीत निवड झाली त्या कंपनीला Bombay Stock Exchange कडून कंत्राट मिळालं होतं. खरतर मग मी या क्षेत्रात पदार्पण केलं. आयुष्यात कायम ही शिकवण मिळाली होती, की जे काम करायचं ते झोकून देऊन करायचं, पूर्णपणे वाहून घेऊन, त्यात घुसून करायचं. सुरुवातीला जरी माझं तिथलं काम हे एका संगणकापुरतं मर्यादित होतं, तरी मी त्यांची संपूर्ण प्रणाली समजून घेतली. कायदे– नियम सगळे समजून घेतले आणि म्हणून तिथल्या जागांवर मला बढती मिळू लागली. मागच्या वर्षांत MCX मधल्या एका महत्त्वाच्या पदाची जबाबदारी घेण्यासाठी त्यांनी भारतातल्या चार जेष्ठ व्यक्तींना विचारलं होतं आणि त्या चौघांकडून एकमताने माझं नाव आलं होतं. त्यामुळे मी घुसले म्हणजे घुसलेच.



आज या क्षेत्रात माझं नाव पुढे केलं जातं कारण मी आयुष्यभर एवढंच काम केलं आहे. स्वतःला झोकून देऊन, दुसरीकडे लक्ष न देता मी हे काम करत होते. तसं म्हणायला गेलं तर मी stock exchange हे क्षेत्र निवडलं नाही ते माझ्या पदरी आलं आणि मग सवयीप्रमाणे मी त्यात घुसले. मी तरी स्वतःला खूप भाग्यवान समजते की मी ज्या क्षेत्रात गेले तिथे मला गती होती, आज आयुष्यात मी जितक्या दुःखी लोकांना पाहते त्यांच्याकडे कौशल्याची कमी नसते किंवा असं काही कारण नसतं, पण ते चुकीच्या ठिकाणी धडपड करत असतात. जो आपल्या स्वभावाचा किंवा स्वतःचा पिंड नसतो तिथे जर तुम्ही विनाकारण झगडत राहिलात तर पुढे जाणं अशक्य आहे. आता मी नृत्य शिकते, गाणं शिकते पण मला पुरेशी स्पष्टता आहे की हा माझा छंद आहे, मी या क्षेत्रात व्यावसायिक म्हणून पुढे जाऊ शकणार नाही हे ठाऊक आहे. आपण खूप चाचपडत असतो, चार पाच गोष्टी एका वेळी करत असतो, आणि आपल्याला त्यातली कुठली गोष्ट करायची, कुठली गोष्ट सोडायची हे जर ओळखता आलं तर आपण त्या क्षेत्रात नक्की उंची गाठू शकतो.

**आप्पा आणि प्रबोधिनीतले अनेक लोक म्हणायचे की नोकरी काय सगळेच करतात, आपण नोकरी देणारे झालो पाहिजे. माझ्या कुटुंबातले अनेक जण व्यवसाय करत होते आणि त्यामुळे मी व्यवसाय करायचा ठरवलं. माझ्या डोक्यात पहिल्यापासून ही स्पष्टता होती मला स्वतःचा व्यवसाय करायचा आहे. नोकरी मी फक्त अनुभवासाठी करत होते. त्यामुळे जेव्हा व्यवसाय उभा केला तेव्हा मला नुकसान होत आहे असं एकाही महिन्यात झाले नाही. माझ्याकडे कायमच कामं होती. भारतातल्या पहिल्या दहा ब्रोकर्स पैकी सातजण माझ्याकडे clients म्हणून होते. आता मी consultant म्हणून काम करते. 'न धरी शस्त्र, करी मी गोष्टी सांगेन युक्तीच्या चार' असं काम मी करते. हे श्रीकृष्णाने सांगितलं होतं आणि तो consultant लोकांचा आद्य दैवत आहे. पण आजही coding चं काम मला आवडतं म्हणून करते. त्या कामाचा मला कधी कंटाळा येत नाही.**

काम करताना आपल्याला अनेक प्रकारचे लोक दिसत असतात. प्रत्येक ठिकाणी अशी माणसं असतात की जी गाडी कुठली आहे यावरून ओळखतात, आणि अशीही माणसं असतात की जी आपले कपडे आणि दिसणं यालाच सगळ्यात जास्त महत्त्व देतात. प्रत्येक ठिकाणी उदार मनाची आणि उदार मतवादी माणसं असतात, तशीच प्रत्येक ठिकाणी कुपमंडूक वृत्तीची माणसं असतात. याचा तुम्ही कुठल्या स्तरावर काम करता याच्याशी काहीही संबंध नसतो. समाजाच्या कुठल्याही स्तरावर ही सगळीच माणसं आपल्याला भेटत राहतात. आता माझ्या मित्रमंडळींमध्ये १५०/२०० कोटी असलेले brokers पण आहेत आणि गरीब घरात राहणारे लोक पण आहेत. आणि ते त्यांच्या–त्यांच्या पूर्वानुभवानुसार आणि त्यांच्या संस्कारानुसार वागत

असतात. They may feel insecure or secure depending upon how their life experiences have been. पण अगदी सर्वसामान्य निकष लावायचा झाला तर जे श्रीमंत लोक असतात ते बोलताना जास्त confident आणि comfortable असतात. ज्यांना आयुष्यात जास्त चटके बसलेले आहेत ती लोकं थोडीशी असुरक्षित असतात. जर कोणाला मान देणं अपेक्षित असेल, सर-सर म्हणावं लागत असेल तर तसं वागावं, जर कोणाला त्यांच्या पातळीला येऊन वागावं असं वाटत असेल तर ती गरज पूर्ण करावी. त्यामुळे मला माझ्यात काही कमी किंवा जास्तपणा आहे असं वाटत नाही.

आता माझ्या हाताखाली जे लोक काम करतात, त्यांना मी मध्यंतरी असं म्हणाले होते की चला आपण आठवड्यातला अर्धा-एक तास improvement साठी काम करूयात, आपल्यातल्या एकाने एखाद्या विषयावर अभ्यास करून बोलायचं आणि त्या निमित्ताने आपला विकास होईल. तेव्हा त्या सगळ्यांनी एका स्वरात सांगितलं की आम्हाला नवीन काही शिकण्यात रस नाही. मला आश्चर्याचा मोठा धक्काच बसला, की आजपर्यंत मी ६०-७० जणांच्या गटाबरोबर काम केलेलं आहे, २०/२० presidents चे गट हाताळले आहेत पण असं मला कधीच कुणीच भेटलेलं नाही ज्यांना नवीन काही शिकण्यात रस नाही. पण मग मी जमेल तेवढं सांगायचा प्रयत्न केला पण पुढे नाही रेटलं आणखी, अशीही माणसं असतात म्हणून सोडून दिलं. प्रत्येक माणूस वेगळा असतो आणि सगळयांशी आपल्याला जमवून घ्यायला लागतं.

**मला माझ्या कामाबरोबरच काहीतरी सामाजिक काम केलं पाहिजे असं वाटत होतं आणि मी MENSA या सामाजिक संस्थेत काम करायला सुरुवात केली. त्यांचं एक radio station होतं, Union Park Residents Association प्रणित 'जागो मुंबई ९०.८'. त्यावर मी निवेदनं करायला सुरुवात केली. मी दोन कार्यक्रम करायचे. एक होता तो वय वर्ष ६०च्या पुढच्या वयोगटासाठी आणि दुसरा fourth seat म्हणून. Fourth seat म्हणजे मुंबईच्या locals मध्ये तीन जणांना बसायला जागा असते. त्यात जेव्हा चौथा माणूस बसतो तेव्हा त्याला fourth seat असं म्हणतात. तर असा हा कार्यक्रम मुंबईतल्या सामान्य कामगार वर्गासाठी होता. मग त्यात कधी पावसाळ्याच्या कविता असायच्या, कधी टिळकांनी केलेलं भाषण असायचं. कचरा प्रकल्पाबद्दल, स्त्री भृणहत्या यावर असेल, असे मी जवळपास १०० कार्यक्रम रेडिओद्वारे प्रसारित केले. तिथलं वातावरण हे प्रबोधिनीपेक्षा अतिशय वेगळं म्हणता येईल असं आहे. अनेक स्वभावांची आणि वेगळी उद्दिष्टं असणारी हुशार माणसं तिथे येतात. त्यांच्याकडे बौद्धिक क्षमता असते पण कार्यकुशलतेचा अभाव जाणवायचा.** मग मी त्यांच्यासाठी वेगवेगळ्या गणपतींना भेट देऊया, रमजानच्या वेळेस मशिदीला भेट देऊन येऊया असं वर्षातून काहीतरी नियोजन करायचे. त्यांना देशाभिमुख करण्याचा प्रयत्न करायचे. तिथे मला आयुष्यभरासाठीचे मित्र मिळाले, त्यांच्याशी संवाद करणं सोपं जातं आणि त्यांच्याशी मी माझ्या कल्पनांबद्दल बोलू शकते.



**मेन्सा ग्रुप**

त्याबरोबरच मी एक Reading Club चालवते. मला तो एक नेतृत्व शिकण्यासाठीचा मंच वाटतो. आम्ही प्रत्येक वेळेला जेव्हा आता कुठलं नवीन पुस्तक वाचायला घ्यायचं याबद्दल बोलतो, तेव्हा प्रत्येक वेळी consultative leadership हा भाग वापरावा लागतो. बऱ्याचदा मला एखादं पुस्तक वाचायचं नसतं पण कुणीतरी सांगतं म्हणून मी ते घेते. एक The life changing magic of tidying up नावाचं पुस्तक सगळ्यांनी सांगितलं होतं. ते पुस्तक वाचून लोकांनी खरच कपाटं भरून त्यांच्या घरातल्या वस्तू टाकून दिल्या होत्या. पण मला self- help पुस्तक काय वाचायचं असा कायम प्रश्न पडायचा. पण मी ते आग्रहास्तव घेतलं आणि मला खूप आवडलं असं ते पुस्तक आहे. आम्ही खूप वेगवेगळ्या प्रकारचे लोक एकत्र आहोत. काही गृहिणी आहेत, काही विदेशी लोकं आहेत असे वेगळे-वेगळे लोक यानिमित्ताने भेटतात आणि खूप वेगळे विचार ऐकायला मिळतात.

**प्रबोधिनीत असताना नीलाताई देशमुख यांनी मला हाताला धरून एका ताईंकडे गाणं शिकायला नेलं होतं. तिथे मी दोन वर्षं शिकले पण नंतर ते बंद पडलं. पण मला गाणं आवडायचंच. इथे मुंबईत आल्यावर मी पुन्हा गाणं शिकायला सुरुवात केली. माझ्या सासरी गाण्याचं बरच वातावरण होतं. माझे गुरू माझ्या घराच्या वरच राहायचे आणि त्यांनी कधीही माझ्याकडून एक पैसाही घेतला नाही आणि मला खूप पुढचे राग अतिशय तळमळीने आणि प्रामाणिकपणे शिकवले. आता मी गाणं शिकवते याचं एकमेव कारण म्हणजे, त्यांनी जी विद्या जतन करून ठेवली आणि एक पैसाही मोबदला न घेता माझ्यापर्यंत पोचवली आहे ते पुढे नेणं मला माझी जबाबदारी वाटते. नृत्याच्या प्रवासाबद्दल बोलायचं झालं तर मी एका**



**समारंभात कथ्थक नृत्य पाहिलं आणि आपल्याला हे नक्की जमलं पाहिजे अशी इच्छा मनात तयार झाली. वयाच्या ४०व्या वर्षी काहीही येत नसताना शिक्षण सुरू केलं आणि दोन वर्षांपूर्वी माझं विशारद पूर्ण झालं. आता फक्त तिथले गुरू सांगतात म्हणून मी शिकवते. त्यांचं असं म्हणणं होतं, की शिकवल्यावर तुझं जास्तं पक्कं होईल आणि त्यांच्या शब्दाचा मान राखायचा म्हणून मी ते करते. या कलेच्या शिक्षणातून मला काय मिळालं तर नवरस असतील किंवा आपल्या मंदिरांमध्ये काय गोष्टी असतात, त्या तिथे का असतात हे मी समजून घेऊ शकत होते. आपल्यात जेव्हा क्रोध हा रस उत्पन्न होतो तेव्हा तो सांगतो तसं आपण ऐकत जातो आणि आपला स्वतःवर ताबा राहात नाही. ज्या क्षणी तुम्हाला हे जाणवतं की हा 'क्रोधरस' आहे किंवा हा 'भयरस' आहे त्या क्षणी तुम्ही स्वतःवर ताबा मिळवायला सुरू करता. मंदिरात रामाची आणि रावणाचीही गोष्ट का सांगायची? तर तो रावणही आपल्या आतमध्ये असतो आणि आपल्याला त्याला ओळखून हरवता आलं पाहिजे. हे मी जेव्हा नृत्याची पुस्तकं उघडली तेव्हा मला कळलं. मी ज्ञानेश्वरीत वाचलं होतं की जसं-जसं तुम्ही अधात्मिक प्रगती करता तसं तुमचं शरीर सुंदर व्हायला लागतं, तेव्हा मला प्रश्न पडला होता की हे असं का लिहिलंय? पण आता नृत्य शिकल्यावर जेव्हा माझे हातपाय बदलले, चालण्याची पद्धत बदलली तेव्हा मला त्या ओळीचा अर्थ मुळापासून कळतो आहे.**

आता आयुष्याची पन्नास वर्षं झाल्यावर मला असं वाटतं की आयुष्यात मी जे काही केलं आहे, जेवढ मिळवलं आहे ते आता या पुढच्या आयुष्यात मी समाजापर्यंत पोचवणार आहे. जे काही सामाजिक काम मी करते त्या मागचा हाच उद्देश असतो, जे काही मला माझ्या गुरुजनांनी दिलं आहे, मग ती सवय असेल, विचार करण्याची पद्धत असेल हे मला पुढे न्यायचं आहे. म्हणजे कदाचित नलूताईंनी जे chemistry शिकवलं, त्यातली सूत्र पुढे न्यावी असा त्याचा अर्थ नसून तर त्यांनी जितक्या तळमळीने एखादी गोष्ट देण्याचा प्रयत्न केला हे पुढच्या पिढीपर्यंत पोचवायला हवं असं मला वाटतं. आज हे सांगतानाही मला भरून येत आहे की मला हे सगळं माझ्या गुरुजनांनी उघड्या हाताने दिलं आहे, फुकट दिलं आहे आणि आता मी ते पुढे नेलेच पाहिजे. माझा गृहस्थाश्रम झाला, पैसे कमवून झाले, ज्या शंभर गोष्टी मला करायच्या होत्या त्या सगळ्या करून झाल्या. आता पुढच्या आश्रमात जे मला मिळालं ते समाजाला मी द्यायला हवं असं मला वाटतं.



आत्ताच्या माझ्या कामाबद्दल बोलायचं झालं तर मी आठवड्यातून तीन तास गायन आणि तीन तास नृत्य या सगळ्यासाठी देते. रोज सकाळी योगासनं आणि रोज सकाळी ध्यान करते. कामाचं सांगायचं तर मी सध्या multi commodities exchange ची संपूर्ण system मोडीत काढून नवीन बसवायचं काम करते आहे. पुढील एक-दीड वर्ष तरी तेच काम चालू राहील. मी सोसायटीची सेक्रेटरी आहे तेव्हा रोज संध्याकाळी ते काम करते. आणि दर शनिवार रविवारी MENSA आणि Book Reading Club याच्या जबाबदाऱ्या बघत असते. मला आई-वडील आणि सासू-सासरे असे आता कोणीच नाहीत. त्यामुळे माझ्यावर कौटुंबिक अशी फारशी जबाबदारी नाही. एवढ्या सगळ्या जबाबदाऱ्या सांभाळताना एक गोष्ट निकराने करावी लागते ती म्हणजे switch on आणि switch off करता येणे. मला अगदी १०० टक्के खात्री आहे की हे कौशल्य ध्यानानेच तयार होऊ शकतं. जेव्हा मी एक गोष्ट करायला घेते तेव्हा मला दुसरी गोष्ट आठवतही नाही. So actually I think that, it is never multitasking, it is always one task at a time. अर्थातच या सगळ्याला नियोजन लागतं, नियोजनाप्रमाणेच गोष्टी रोज पार पडतात. मला मुळातच शिस्त खूप आवडते. जरा जास्तच आवडते असं म्हटलं तरी हरकत नाही. मी कुठेही गेले, एखादं पेन तिरकं दिसलं की मी ते सरळ करते. माझी आजी आणि माझ्या सासूबाई यांना मी कधीच निवांत आणि विश्रांत बसलेलं पाहिलं नाही. त्यामुळे साहिजकच निवांत झोपणं किंवा मालिका पाहणं हा माझा पिंड नव्हे. मी कायम त्यांचाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून चालते आहे.

मला असं वाटतं की दिवसभरात जर आपण, आपल्याला दोन वेळेचं जेवण मिळवण्यासाठी जी हालचाल, जी धावपळ करावी लागते, जर आपण ती तेवढी हालचाल केली नाही तर आपण आनंदी राहू शकणार नाही. We are biologically programmed in that way. जर एखाद्या दिवशी तुम्ही म्हणालात की आज मी नुसती बसणार आणि टी.व्ही.

बघणार तर तुम्ही निश्चितच आनंदी राहू शकणार नाही. तेवढी हालचाल आपल्या आनंदासाठी गरजेची आहे. It doesn't matter how much money you have, it is extremely difficult to sit and do nothing. I don't do anything to be great or anything but just because I would be unhappy otherwise.

**आज माझ्या आयुष्यात मी या सगळ्याचा समतोल शोधते आहे. एखाद्या दिवशी जर काम सुरू झालं तर १२–१४ तास तेच चालू असतं अशा टोकाला गेलेलं मला आवडत नाही. मला मनापासून ५० गोष्टी करायला आवडतात. मी सोसायटीच्या सेक्रेटरीचं पण काम करेन, मी गाणं पण करेन, मी नाचही करेन आणि मग उरलेल्या ७–८ तासात मी माझं काम करेन, पण तसं होत नाही. माझा दिवस कधीतरी out of balance जातो. त्यामुळे आपसूकच त्या पन्नास गोष्टी होतात, पण त्या सगळ्यात अजूनही तो समतोल, तो balance नाही असं मला वाटत राहतं.**



**जेव्हा माझा नवरा गेला तेव्हा मी थोडी deprsssion मध्ये होते. म्हणजे काम म्हणून बघितलं तर माझा व्यवसाय वाढत होता, माझं काम उत्तमच चालू होतं पण वैयक्तिक आयुष्यात माझी अवस्था फारशी ठीक अशी नव्हती. मी स्वतःला कोंडून घेतलं होतं, I started building walls around me. तेव्हा माझ्या बहिणीने सोबत नेण्याचं निमित्त करून महाबळेश्वर इथे एकदा मला व्याख्यानमालेसाठी नेलं होतं. तिथे जस्टीस दुधाड म्हणून जे गुरुजी होते, त्यांचं बोलणं ऐकताना मला असं वाटलं की माझ्या मनात जो प्रश्न आहे, बरोबर त्याच शब्दात समोरून उत्तर येत आहे. मग त्यांच्या घरी दर मंगळवारी meditation ला जायला लागले, मग त्यांच्या सगळ्या व्याख्यानांना जायला लागले. शब्दशः सांगायचं झालं तर गुरू म्हणजे जो प्रकाश दाखवतो तो. आणि तो मला माझ्या गुरुजींच्या रूपात बसलेला दिसला. घरात वडिलांची पार्श्वभूमी होती. माझे वडील म्हणजे अगदी संत व्यक्तिमत्त्व होते. जेव्हा त्यांचं निधन झालं तेव्हा अगदी रिक्षेवालेसुध्दा घरी येऊन गेले, त्यांच्या नावे सेंद्रिय शेतीचं पारितोषिक दिलं जातं, कधीही पैशाच्या मागे लागले नाहीत, जे होते ते पैसेही वाटून टाकायचे. ज्याला जितकी आणि जशी मदत होईल तितकी आणि तशी मदत करण्याचा प्रयत्न त्यांचा असायचा. त्यामुळे ते संस्कार कायमच होते. प्रबोधिनीत पण आपण उपासना करायचो पण त्यात मध्ये खंड पडलेला होता.**

माझे गुरुजी गेल्यानंतर मी विपश्यनेचा दोनदा अनुभव घेतला आणि तिथे मला खूप पुढचे अनुभव आले. आता मी माझा माझा प्रयत्न करते, गीता वाचते, ध्यान करते. मी भक्तीमार्गात कधीच नव्हते, माझा कायम ज्ञानमार्गच होता. पण आता माझं असं म्हणणं आहे की आपण त्या अनुभवांच्या पलीकडे जायला हवे. कारण आपण बऱ्याचदा एखादं चक्र किंवा तत्त्व मग त्याचा अर्थ या बौद्धिक गुंतागुंतीत अडकून राहतो, विचार जास्त आणि सराव कमी होतो. पण तिथे मी जे केलं ते अतिशय मन लावून केलं. ही गोष्ट तुम्ही स्वतःशी खोटं बोलून साध्य करू शकत नाही. जर तुम्हाला अध्यात्मिक प्रगती करायची असेल तर तुम्हाला आतून स्वच्छ होण्याची, शुध्द होण्याची तळमळ असावी लागते, इच्छा असावी लागते. आपल्याला जसं सकाळी दात घासल्याशिवाय समाधान मिळत नाही तसं ध्यानाच्याबाबतीत व्हायला पाहिजे. जर तसं होत नसेल तर कदाचित तुम्ही दुसरा कुठलातरी रस्ता शोधून पहायला हरकत नाही. काय करायचं हे आपल्या–आपल्या प्रगतीनुसार समोरून येत जातं. ते फारसं महत्त्वाचं आहे असं मला वाटत नाही, पण जो मार्ग तुम्ही निवडाल त्याच्याशी प्रामाणिक राहून ते sincerly करावं लागतं.

**खरंतर विपश्यनेला सलग नऊ तास बसणं मला आवडतं पण अजूनही मला किती वेळ अध्यात्माला द्यायचा, किती वेळ कामाला द्यायचा याचा समन्वय साधणे साध्य होत नाही. पूर्णवेळ अध्यात्म मार्गावर चालायचं का या प्रश्नाचं उत्तर मी अजून शोधते आहे. आपल्याकडे जी आश्रम व्यवस्था सांगितलेली आहे त्यानुसार वयाच्या ७५ वर्षानंतर पूर्णवेळ अध्यात्म सुरू करावं असा विचार मला सध्या बरोबर वाटतो. पुढच्या आयुष्याची दिशा असं म्हणायचं झालं तर अर्थार्जन कमी करत सामाजिक काम वाढवणे हा पहिला टप्पा आणि त्यानंतर सामाजिक कामही संपूर्ण कमी करून अध्यात्माकडे वळणे हा दुसरा टप्पा असं म्हणता येईल.**

व्यक्ती म्हणून मी drifter आहे, अगदी सुरुवातीपासूनच आयुष्यात जशा–जशा गोष्टी येत गेल्या तशी मी त्यांना सामोरी जात गेले, खूप मोठी स्वप्न किंवा महत्त्वाकांक्षा अशी काही माझ्या आयुष्यात कधीच नव्हती. मला खरंच असा प्रश्न पडला होता की तुम्ही माझी मुलाखत का घेत आहात? मी अतिशय सामान्य व्यक्ती आहे, तसं मी खूप उज्ज्वल आणि मोठं असं आयुष्यात काहीच केलं नाही, सगळ्या गोष्टी अगदी अर्ध्या–अर्ध्या सोडल्या आहेत. माझा resume जर तुम्ही पाहिलात तर त्यात खूप लहान–लहान गोष्टी खूप आहेत पण एक मोठं असं मी काहीच केलं नाही.

**पूर्वी लाखो वर्षे बायकाच घर चालवायच्या, बायकाच मुलं सांभाळायच्या, त्या नदी–नाले पार करून पोहत जाऊन बोरं तोडून आणायच्या आणि मुलांना खायला द्यायच्या. १८व्या शतकात औद्योगीकरण सुरू झालं आणि या सगळ्याच्या व्याख्या बदलत गेल्या. मला १९९२ साली ONGC मध्ये काम करता आलं नाही कारण तिथे महिलांसाठी प्रसाधनगृह नव्हती. Air India ची सुद्धा तीच गत. Bombay Stock Exchange ची २८ मजली इमारत १९७८ साली बांधली पण त्यात एकही प्रसाधनगृह महिलांसाठी बांधलं गेलं नाही. यावरून आपल्याला हे कळतं की हे समाजाने गृहीत धरलं की महिला कामच करणार नाहीत. त्या कायम दुसऱ्या कोणावर तरी अवलंबूनच राहतील. सोसायटीच्या कामाबद्दल बोलायचं तर, जेव्हा इथे एखादा प्रश्न जाणवतो, जसं वीज नाहीये, पाणी नाहीये, तेव्हा सगळ्या महिलाच फोन करतात. पण त्या सगळ्याच्या अध्यक्षपदी मात्र पुरुष बसलेला दिसतो. त्यावरून मला असं वाटतं की You are not valuing the work women do at home and that's why she want to make a career. Why does a women want to make a career? Because the society has given an impression that making money is being successful. It is not true. That definition of success is wrong. If society wants to propagate itself then raising good children who are beneficial to the society is a huge contribution to a society which is completely ignored. Will society accept the notion of, either not giving birth to children, or just leaving them in threshold and let them grow and tune as that thresh women wants to and earning money because that's what is big deal isn't it? Even now after 50 years I tell that money isn't a big deal. You cannot buy the happiness from it. You need a certain amount of money for being comfortable but beyond that it is silly. Why women rather men also running behind money or career? Because the society has given a very high preference to money making ability. And actually speaking it is such a small and useless thing in life. Now having said that if a women wants to make a career, it seems very difficult. Because I see women these days are torn between raising children and making a career.** मला मूल नाही म्हणून मी माझ्या कामात एवढी पुढे जाऊ शकले, पण आज मी जिथे आहे त्या पदावरच्या काम करणाऱ्या स्त्रियांचा विचार करायचा झाला तर त्यांच्याकडे एकत्र कुटुंब नाही किंवा नवरा आणि त्याच्या घरचे अत्यंत समजून घेणारे आणि प्रोत्साहन देणारे आहेत. पण जेव्हा आपण support करणे असं म्हणतो त्याचा अर्थ नोकरी करायला हवी असा सहसा होत नाही. जर एखादी स्त्री घरी काम करत असेल तर तिलाच असं वाटत राहतं की आपण कमी काम करतोय आणि आपण आपल्याच कामाला कमी लेखतो म्हणून समाजाचा दृष्टीकोन तसाच होतो. घरचं काम हे कधीच कमी नसतं, हे आधी स्त्रियांनीच ठरवायला पाहिजे. पैसे हा भाग सोडता साधा मानही घरी काम करणाऱ्या बाईला मिळत नाही. मग स्त्रिया हेच म्हणणार, तुम्ही सन्मान जर नोकरीला देत असाल तर आम्ही मुलं सांभाळण्यापेक्षा नोकरी करतो.

**Women empowerment is an ability to earn a comfortable living and having a freedom of choosing what she wants to do in her life and be respected for it. Fundamentally speaking, the values and norms must be changed and women working at home must be valued for the work she is doing for the society. It is social work that she is doing at that home. Otherwise she must be allowed to work from home. जर बायका मुला–बाळांना घेऊन शेतावर जात होत्या तर त्या तसं काम का नाही करू शकत? तुम्ही तिला पाच महिन्याची सुट्टी देता पण त्यानंतर ती दरी भरून काढण्याची संधी का नाही देत? Even today a women has to be double efficient as man to be anywhere in this world. आजही घरी कामाला बाई आली नाही किंवा घरी मुलगा आजारी आहे तर बाईला सुट्टी घ्यावी लागते, नवरा कामावर जातो. आणि जर नवऱ्याने सुट्टी घेतली तर तो मदत करतो असं म्हटलं जातं. का? मदत का? ते मूळ काम त्याचं नव्हे का? ते कामही बायकोनेच करायचं हे ठरलेलं असतं का? या सगळ्याचा विचार करून जर बोलायचं झालं तर किमान स्त्रियांनी असं क्षेत्र निवडावं जे त्यांना सहजरित्या जमू शकेल. त्यांची बुद्धी आणि त्याचं कौशल्य जिथे पहिल्यापासून आहे असं क्षेत्र त्यांनी काम करण्यासाठी निवडावं. तुम्हाला जे क्षेत्र आवडतं तिथे तुम्ही जा. केवळ पैसा भरपूर मिळतो म्हणून कुठलही क्षेत्र निवडू नका.**

मला संस्कृत, हिंदी आणि इंग्लिश या सगळ्या भाषा ज्याप्रकारे प्रबोधिनीत शिकवल्या त्याचा खूप उपयोग झाला. इंग्रजीतर कामासाठी झालीच पण संस्कृत भाषेचा त्याला base असल्याशिवाय सगळं फोल आहे असं म्हणता येईल. कारण आज गीता वाचणे आणि गीतेचं भाषांतर वाचणे यात जमीन अस्मानाचा फरक पडतो. कितीही नाही म्हटलं तरी अनुवादामध्ये त्या व्यक्तीचा दृष्टीकोन थोडा का होईना आलेला असतो. त्यामुळे प्रत्येकच भाषा अगदी चांगल्या पद्धतीने शिकवण्याबद्दल मी प्रबोधिनीची अतीव ऋणी आहे.

शाळेत असताना माझी खूप ठाम मतं होती की हिंदूच बरोबर आणि बाकी सगळे चूक. जेव्हा शाळेबाहेर आले तेव्हा मुस्लीम आणी ख्रिस्चन मित्र मिळाले. आणखी एक अशीच माझी समजूत म्हणजे मी हुशार आहे, आणि त्या वाक्याच्या

पाठीमागे कुठेतरी असाही अर्थ असायचा की बाकीचे हुशार नाहीत. पण बाहेर पडल्यावर कळत गेलं, की किती जास्त हुशार लोकं या जगात आहेत आणि हुशार जरी नसतील तरी जर ती माणसं कष्ट करणारी असतील तर त्यांना आपण सन्मान द्यायला हवा. पुण्यातल्या सगळ्या लोकांना मराठी बोलायची सवय असते आणि कामाच्या क्षेत्रात ही सवय मला थोडा चटका लावून गेली असं म्हणायला हरकत नाही.

आयुष्यातल्या गुरुतुल्य व्यक्तींबाबत म्हणायचं झालं तर प्रबोधिनीतले नलूताई, नीलाताई, वामनराव, आप्पा, अण्णा हे सगळे होतेच. ब्रह्मविद्येचे दुधाड गुरुजी आणि विपश्यनेचे गोएंकाजी. महाविद्यालयात असतानाचे प्राध्यापक सहस्रबुद्धे आणि डॉ. शंकर म्हणून होते, त्यांनी फक्त संगणक कधीच शिकवला नाही पण त्याबरोबर आयुष्यात वागण्या बोलण्यापासून अनेक गोष्टी शिकवल्या.

Jnana Prabodhini Alumni Association अंतर्गत जे नवे उद्योजक आहेत त्यांना काही मदत करण्याचं किंवा दिशा देण्याचं काम असेल त्यासाठी मी सध्या कार्यरत आहे. आणि प्रबोधिनीच्या blog साठी अनुवाद करण्याचं काम मी सध्या करते. Thinking about people who have just started their careers, its hard work hard work and hard work. कष्ट करायला घाबरायचं नाही आणि आपण स्त्री आहोत म्हणून कधीही सवलती मागायच्या नाहीत. मी एकटी कसं करू? एकटी कशी जाऊ? असे प्रश्न कधीही विचारायचे नाहीत. १२ तास तर १२ तास, १३ तास तर १३ तास, करायची कामं. नवीन-नवीन पगार मिळाल्यावर जर तुम्ही असं म्हणत बसलात की चला picture बघू, चला मजा करू, तर याने career कधीही घडत नाही. सुरुवातीपासून त्या क्षेत्रातलं ज्ञान आणि खोलवरची समज मिळवावी लागते. आणखी एक गोष्ट म्हणजे कधीच कुठेच हुशार असली तरी आगाऊ एकलकोंडी काम करणारी माणसं कोणालाच नको असतात, सगळ्यांना समजून घेत, बांधून ठेवत पुढे जाणारी माणसं सगळीकडे हवी असतात. सतत नवीन-नवीन शिकत रहा...कष्ट करायला घाबरू नका...जिथे गरज असेल तिथे सर्वस्व द्यायलाही घाबरायचं नाही.



With croc

**दक्षिण अमेरिकेतील प्राण्यांसोबत**



With llama and alpaca



**With sloth**

## RAPID FIRE

१. आवडता चित्रपट– मी फारसे चित्रपट बघत नाही.

२. आवडत पुस्तक–The life Changing art of tidying.

३. आवडते गायक– रशीद खान

४. आवडते प्रबोधिनीतले शिक्षक – नलूताई गुजराथी.

५. पहिली प्रतिक्रिया –

- Women entrepreneur - why it is women? Entrepreneur is an entrepreneur
- Entrepreneur - all-rounder
- Spirituality - something to be done everyday
- Stock market- सट्टाबाजार
- Art - Something beyond skill, one way to reach to the god

6. ज्ञान प्रबोधिनी – A set of very sincere people. Very honest and very patriotic

**गीतांजली भट – नानिवडेकर**
**9821084866**
**sngeetanjalee@gmail.com**

**मुलाखत – ईशा कान्हेरे, चिन्मयी खरे, अपूर्वा इनामदार** **शब्दांकन – चिन्मयी खरे**

**संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org